# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- १४/०२/२०२०

## मा. विशेष महासभा

मा. विशेष महासभा सुचना क्र. ०५

प्रति,
सन्मा. श्री./श्रीमती ------------------------------------
नगरसेवक / नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगपालिकेची मा. विशेष महासभा गुरुवार दि. २०/०२/२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०५ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

मा. महापौर सो. यांच्या मान्यतेने.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

## मा. विशेष महासभा दि. २०/०२/२०२० सभा सुचना क्र. ०५

## विषयपत्रिका

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| ८४ | मेट्रो-९ या कामांतर्गत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास कास्टींग यार्ड, कॉंक्रीट बॅचिंग प्लाट, कामगार निवासस्थाने, कार्यालये यासाठी तात्पुरत्या स्वरुपात जागा उपलब्ध करुन देणेबाबत. |
| ८५ | मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील स्थायी अधिकारी / कर्मचाऱ्यांना दि. ०१/०१/२०१६ पासून सुधारीत वेतनरचना (सातवा वेतन आयोग) लागु करणेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत. |
| ८६ | वसई विरार व मिरा भाईंदर पुढे मुंबईस जोडण्यासाठी रेल्वेच्या पश्चिम बाजूस बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीतील दहिसर लिंक रस्त्यास जोडणारा, ६०.०० मी. रुंद रस्ता विकास योजनेत म.प्र. व न. अ. १९६६ चे कलम ३७ अन्वये दर्शविणेबाबत. |
| ८७ | ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालयातून लाचलुचपत प्रकरणी अटक करण्यात आलेले महानगरपालिकेतील अधिकारी / कर्मचारी यांचेवर मा. न्यायालयात अभियोग दाखल करणेकरीता मा. आयुक्त यांनी दिलेल्या मंजूरी प्रकरणाचे अवलोकन करणे. |
| ८८ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्यानामध्ये CSR फंडा अंतर्गत सौर LED High Mast व सौर दिवे लावणेबाबत. |
| ८९ | विविध विकास कामांना आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणे. (सार्व. बांधकाम विभाग) |

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

महानगरपालिका सचिव कार्यालय
मिरा भाईंदर महानगरपालिका
दिनांक :- १४ फेब्रुवारी, २०२०

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## बांधकाम विभाग

**मा. महासभा दि. २०/०२/२०१९**

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक ( ८४ ) :-** मेट्रो-9 या कामांतर्गत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास कास्टींग यार्ड, काँक्रीट बँचिंग प्लाट, कामगार निवासस्थाने, कार्यालये यासाठी तात्पुरत्या स्वरूपात जागा उपलब्ध करून देणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मेट्रो-9 चे काम सुरू झालेले असून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत सदर काम करण्यात येत आहे. सदर कामासाठी प्राधिकरणामार्फत मे. जे कुमार इन्फ्राप्रोजेक्ट लि. या कंत्राटदाराची नेमणूक केलेली असून प्राधिकरण व कंत्राटदार यांनी सदर कामांतर्गत कास्टींग यार्ड, काँक्रीट बँचिंग प्लाट, कामगार कॅम्प, कार्यालये व त्या अनुशंगिक कामांसाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे जागा उपलब्ध करून देण्याची मागणी केलेली आहे. प्राधिकरण व कंत्राटदार यांच्या मधील निविदा अटीशर्तीनूसार प्राधिकरणास कंत्राटदार यांना सदर कामांसाठी रु.1/- प्रति चौ.मीटर प्रति महिना या दराने जागा उपलब्ध करून द्यावयाची आहे. सदर प्रकल्प मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या नागरीकांसाठी असल्याने व कामात सहकार्य करण्याच्या दृष्टीने मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या खालील जागा तात्पुरत्या स्वरूपात उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

1) आरक्षण क्र.354 (व्यायाम शाळा) सदर जागेतील बस डेपो घोडबंदर नविन बस डेपोत स्थलांतरीत करून सदर जागा उपलब्ध करुन देण्यात येत आहे.
2) आरक्षण क्र. 355 मैदानाची जागा
3) आरक्षण क्र.368 उद्यानाची जागा

वरीलप्रमाणे जागा उपलब्ध करून देण्यात आलेल्या असून सदर केलेल्या कार्यवाहीस मान्यता देणेस शिफारस आहे.

(बालाजी खतगांवकर) २५/२/१९
**आयुक्त**
मिरा भाईंदर महानगरपालिका

PC-3/DK/2019-20/MG-3

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २० / ०२ /2019

प्रकरण क्र. ८५ मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील स्थायी अधिकारी/कर्मचाऱ्यांना दि.01/01/2016 पासुन सुधारीत वेतनसंरचना (सातवा वेतन आयोग) लागु करणेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

राज्यातील महानगरपालिकांमधील (बृहन्मुंबई महानगरपालिका वगळून) अधिकारी/कर्मचाऱ्यांना 7 व्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार वेतनश्रेणी लागु करण्यास शासन निर्णय क्र.एमसीओ-2019/प्र.क्र.102/नवि-14, दि.02 ऑगस्ट, 2019 अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील स्थायी अधिकारी/कर्मचारी यांना सातवा वेतन आयोग लागु करण्यास मान्यता मिळण्याकरीता खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

1. शासन निर्णय क्र.मिभाम-1116/प्र.क्र.36(भाग-1)/16/नवि-28, दि.26/02/2019 नुसार मिरा भाईंदर महानगरपालिका आकृतीबंधास मान्यता दिल्यानुसार मंजुर पदाची सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी व सातव्या वेतन आयोगानुसार देय होणारी सुधारीत वेतनश्रेणी खालीलप्रमाणे:-

| अ.क्र. | पदनाम | 6 व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी | 7 व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| | | वर्ग-01 | |
| 1. | उपायुक्त | 15600-39100 ग्रेड पे 5400 | S-20 56100-177500 |
| 2. | मुख्य लेखा व वित्त अधिकारी | 15600-39100 ग्रेड पे 5400 | S-20 56100-177500 |
| 3. | शहर अभियंता | 15600-39100 ग्रेड पे 7600 | S-25 78800-209200 |
| 4. | अतिरिक्त शहर अभियंता | 15600-39100 ग्रेड पे 7600 | S-25 78800-209200 |
| 5. | कार्यकारी अभियंता (मॅकॅनिकल) | 15600-39100 ग्रेड पे 6600 | S-23 67700-208700 |
| 6. | कार्यकारी अभियंता (स्थापत्य) | 15600-39100 ग्रेड पे 6600 | S-23 67700-208700 |
| 7. | कार्यकारी अभियंता (विद्युत) | 15600-39100 ग्रेड पे 6600 | S-23 67700-208700 |
| 8. | उप-अभियंता (मॅकॅनिकल) | 15600-39100 ग्रेड पे 5400 | S-20 56100-177500 |
| 9. | उप-अभियंता (स्थापत्य) | 15600-39100 ग्रेड पे 5400 | S-20 56100-177500 |
| 10. | उप-अभियंता (विद्युत) | 15600-39100 ग्रेड पे 5400 | S-20 56100-177500 |
| 11. | महापालिका सचिव | 15600-39100 ग्रेड पे 5400 | S-20 56100-177500 |
| 12. | पशुशल्य चिकित्सक | 15600-39100 ग्रेड पे 5400 | S-20 56100-177500 |
| 13. | मुख्य अग्निशमन अधिकारी | 15600-39100 ग्रेड पे 5400 | S-20 56100-177500 |
| 14. | वैद्यकीय आरोग्य अधिकारी | 15600-39100 ग्रेड पे 7600 | S-25 78800-209200 |
| 15. | वैद्यकीय अधिकारी | 15600-39100 ग्रेड पे 5400 | S-20 56100-177500 |
| 16. | वैद्यकीय अधीक्षक | 15600-39100 ग्रेड पे 6600 | S-23 67700-208700 |
| 17. | वैद्यकीय अधिकारी (शस्त्रक्रिया) | 15600-39100 ग्रेड पे 5400 | S-20 56100-177500 |
| 18. | वैद्यकीय अधिकारी (स्त्रीरोग व प्रसुतीतज्ञ) | 15600-39100 ग्रेड पे 5400 | S-20 56100-177500 |
| 19. | वैद्यकीय अधिकारी (बालरोग) | 15600-39100 ग्रेड पे 5400 | S-20 56100-177500 |
| 20. | वैद्यकीय अधिकारी (भिषक) | 15600-39100 ग्रेड पे 5400 | S-20 56100-177500 |
| 21. | वैद्यकीय अधिकारी (बधिरीकरण शास्त्रज्ञ) | 15600-39100 ग्रेड पे 5400 | S-20 56100-177500 |

| अ.क्र. | पदनाम | 6 व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी | 7 व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| 22. | मुख्य उद्यान अधीक्षक | 15600-39100 ग्रेड पे 5400 | S-20 56100-177500 |
| 23. | सिस्टिम मॅनेजर | 15600-39100 ग्रेड पे 5400 | S-20 56100-177500 |
| 24. | शहर क्षयरोग अधिकारी | 15600-39100 ग्रेड पे 6600 | S-23 67700-208700 |
| 25. | माता व बाल कल्याण अधिकारी | 15600-39100 ग्रेड पे 6600 | S-23 67700-208700 |
| 26. | आरोग्य अधिकारी (रुग्णालय/ प्रतिबंधात्मक उपाय) | 15600-39100 ग्रेड पे 6600 | S-23 67700-208700 |
| | वर्ग-02 | | |
| 27. | विधी अधिकारी | 9300-34800 ग्रेड पे 4400 | S-15 41800-132300 |
| 28. | माहिती व जनसंपर्क अधिकारी | 9300-34800 ग्रेड पे 4400 | S-15 41800-132300 |
| 29. | समाज विकास अधिकारी | 9300-34800 ग्रेड पे 4400 | S-15 41800-132300 |
| 30. | सिस्टिम ॲनालिस्ट | 9300-34800 ग्रेड पे 4400 | S-15 41800-132300 |
| 31. | महिला व बाल कल्याण अधिकारी | 9300-34800 ग्रेड पे 4400 | S-15 41800-132300 |
| 32. | सुरक्षा अधिकारी | 9300-34800 ग्रेड पे 4400 | S-15 41800-132300 |
| 33. | मुख्य सर्व्हेअर | 9300-34800 ग्रेड पे 4400 | S-15 41800-132300 |
| 34. | वैद्यकीय अधिकारी | 9300-34800 ग्रेड पे 4400 | S-15 41800-132300 |
| 35. | लेखा परीक्षा अधिकारी | 9300-34800 ग्रेड पे 4400 | S-15 41800-132300 |
| 36. | उप-मुख्य लेखापरीक्षक | 9300-34800 ग्रेड पे 4600 | S-16 44900-142400 |
| 37. | लेखाधिकारी | 9300-34800 ग्रेड पे 4400 | S-15 41800-132300 |
| 38. | सहाय्यक अधिसेविका | 9300-34800 ग्रेड पे 4400 | S-15 41800-132300 |
| 39. | उप मुख्य अग्निशमन अधिकारी | 9300-34800 ग्रेड पे 4600 | S-16 44900-142400 |
| 40. | अग्निशमन केंद्र अधिकारी | 9300-34800 ग्रेड पे 4400 | S-15 41800-132300 |
| 41. | सहा.आयुक्त | 9300-34800 ग्रेड पे 4600 | S-16 44900-142400 |
| 42. | प्रशासकीय अधिकारी | 9300-34800 ग्रेड पे 4400 | S-15 41800-132300 |
| 43. | महापालिका उप-सचिव | 9300-34800 ग्रेड पे 4400 | S-15 41800-132300 |
| 44. | उप-मुख्य उद्यान अधीक्षक | 9300-34800 ग्रेड पे 4400 | S-15 41800-132300 |
| 45. | शाखा अभियंता (मेकॅनिकल) | 9300-34800 ग्रेड पे 4400 | S-15 41800-132300 |
| 46. | शाखा अभियंता (स्थापत्य) | 9300-34800 ग्रेड पे 4400 | S-15 41800-132300 |
| 47. | शाखा अभियंता (विद्युत) | 9300-34800 ग्रेड पे 4400 | S-15 41800-132300 |
| 48. | ऑपरेशन मॅनेजर | 9300-34800 ग्रेड पे 4400 | S-15 41800-132300 |
| 49. | डेपो मॅनेजर | 9300-34800 ग्रेड पे 4400 | S-15 41800-132300 |
| 50. | आय.टी.एस ऑफिसर (परिवहन) | 9300-34800 ग्रेड पे 4400 | S-15 41800-132300 |
| 51. | मुख्य स्वच्छता अधिकारी | 9300-34800 ग्रेड पे 4600 | S-16 44900-142400 |
| 52. | उप-मुख्य स्वच्छता अधिकारी | 9300-34800 ग्रेड पे 4400 | S-15 41800-132300 |
| 53. | उप-मुख्य लेखा व वित्त अधिकारी | 9300-34800 ग्रेड पे 4600 | S-16 44900-142400 |
| | वर्ग-03 | | |
| 54. | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | 9300-34800 ग्रेड पे 4200 | S-13 35400-112400 |
| 55. | कनिष्ठ अभियंता(मेकॅनिकल) | 9300-34800 ग्रेड पे 4200 | S-13 35400-112400 |
| 56. | कनिष्ठ अभियंता (विद्युत) | 9300-34800 ग्रेड पे 4200 | S-13 35400-112400 |
| 57. | सर्व्हेअर | 5200-20200 ग्रेड पे 2400 | S-8 25500-81100 |

| अ.क्र. | पदनाम | 6 व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी | 7 व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| 58. | वरिष्ठ लिपीक | 5200-20200 ग्रेड पे 2400 | S-8 25500-81100 |
| 59. | लिपीक टंकलेखक | 5200-20200 ग्रेड पे 1900 | S-6 19900-63200 |
| 60. | प्लंबर | 5200-20200 ग्रेड पे 1900 | S-6 19900-63200 |
| 61. | फिटर | 5200-20200 ग्रेड पे 1900 | S-6 19900-63200 |
| 62. | मिस्त्री | 5200-20200 ग्रेड पे 1900 | S-6 19900-63200 |
| 63. | वाहन चालक | 5200-20200 ग्रेड पे 1900 | S-6 19900-63200 |
| 64. | पंप चालक | 5200-20200 ग्रेड पे 1900 | S-6 19900-63200 |
| 65. | अनुरेखक | 5200-20200 ग्रेड पे 2400 | S-8 25500-81100 |
| 66. | दूरध्वनी सहाय्यक | 5200-20200 ग्रेड पे 1900 | S-6 19900-63200 |
| 67. | विजतंत्री | 5200-20200 ग्रेड पे 1900 | S-6 19900-63200 |
| 68. | संगणक प्रोग्रामर | 9300-34800 ग्रेड पे 4200 | S-13 35400-112400 |
| 69. | बालवाडी शिक्षिका | 5200-20200 ग्रेड पे 1900 | S-6 19900-63200 |
| 70. | कार्यालयीन अधीक्षक | 9300-34800 ग्रेड पे 4300 | S-14 38600-122800 |
| 71. | स्वच्छता अधिकारी | 9300-34800 ग्रेड पे 4300 | S-14 38600-122800 |
| 72. | स्वच्छता निरीक्षक | 5200-20200 ग्रेड पे 2400 | S-8 25500-81100 |
| 73. | परिचारीका | 9300-34800 ग्रेड पे 4200 | S-13 35400-112400 |
| 74. | प्रसविका (ए.एन.एम) | 5200-20200 ग्रेड पे 2400 | S-8 25500-81100 |
| 75. | परिसेविका | 9300-34800 ग्रेड पे 4300 | S-14 38600-122800 |
| 76. | अधिपरिचारीका | 9300-34800 ग्रेड पे 4200 | S-13 35400-112400 |
| 77. | क्ष-किरण तंत्रज्ञ | 9300-34800 ग्रेड पे 4200 | S-13 35400-112400 |
| 78. | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | 9300-34800 ग्रेड पे 4200 | S-13 35400-112400 |
| 79. | प्रयोगशाळा सहाय्यक | 5200-20200 ग्रेड पे 2000 | S-7 21700-69100 |
| 80. | औषध निर्माता /औषध निर्माण अधिकारी | 5200-20200 ग्रेड पे 2800 | S-10 29200-92300 |
| 81. | अग्निशमन प्रणेता | 5200-20200 ग्रेड पे 2400 | S-8 25500-81100 |
| 82. | चालक-यंत्रचालक | 5200-20200 ग्रेड पे 2400 | S-8 25500-81100 |
| 83. | सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी | 9300-34800 ग्रेड पे 4200 | S-13 35400-112400 |
| 84. | अग्निशामक | 5200-20200 ग्रेड पे 2000 | S-7 21700-69100 |
| 85. | ग्रंथपाल | 9300-34800 ग्रेड पे 4200 | S-13 35400-112400 |
| 86. | वायरमन | 5200-20200 ग्रेड पे 1900 | S-6 19900-63200 |
| 87. | उद्यान अधीक्षक | 9300-34800 ग्रेड पे 4200 | S-13 35400-112400 |
| 88. | लेखापाल | 9300-34800 ग्रेड पे 4200 | S-13 35400-112400 |
| 89. | डायलिसीस तंत्रज्ञ | 9300-34800 ग्रेड पे 4200 | S-13 35400-112400 |
| 90. | लेखापरीक्षक | 9300-34800 ग्रेड पे 4200 | S-13 35400-112400 |
| | | वर्ग-04 | |
| 91. | शिपाई | 4440-7440 ग्रेड पे 1300 | S-1 15000-47600 |
| 92. | मजूर | 4440-7440 ग्रेड पे 1300 | S-1 15000-47600 |
| 93. | वॉल्व्हमन | 4440-7440 ग्रेड पे 1300 | S-1 15000-47600 |
| 94. | गवंडी | 4440-7440 ग्रेड पे 1300 | S-1 15000-47600 |

| अ.क्र. | पदनाम | 6 व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी | 7 व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| 95. | रखवालदार | 4440-7440 ग्रेड पे 1300 | S-1 15000-47600 |
| 96. | प्रमुख माळी | 5200-20200 ग्रेड पे 1800 | S-5 18000-56900 |
| 97. | माळी | 4440-7440 ग्रेड पे 1300 | S-1 15000-47600 |
| 98. | पंपमदतनीस | 4440-7440 ग्रेड पे 1300 | S-1 15000-47600 |
| 99. | दवंडी बोअरवेल | 4440-7440 ग्रेड पे 1300 | S-1 15000-47600 |
| 100. | मुकादम | 4440-7440 ग्रेड पे 1600 | S-3 16600-52400 |
| 101. | नाईक | 4440-7440 ग्रेड पे 1600 | S-3 16600-52400 |
| 102. | ग्रंथपाल परिचर (अटेंडंट) | 4440-7440 ग्रेड पे 1300 | S-1 15000-47600 |
| 103. | शस्त्रक्रिया गृहपरिचर | 5200-20200 ग्रेड पे 1800 | S-5 18000-56900 |
| 104. | बाहयरुग्ण सेवक | 4440-7440 ग्रेड पे 1300 | S-1 15000-47600 |
| 105. | कक्षसेवक | 4440-7440 ग्रेड पे 1300 | S-1 15000-47600 |
| 106. | शिपाई तथा सफाई कामगार | 4440-7440 ग्रेड पे 1300 | S-1 15000-47600 |
| 107. | सफाई कामगार | 4440-7440 ग्रेड पे 1300 | S-1 15000-47600 |

2. मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील खालील संवर्गातील स्थायी अधिकारी/कर्मचारी यांना दि.01/01/2016 पासून दि.25/02/2019 पर्यत सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी व सातव्या वेतन आयोगानुसार देय होणारी सुधारीत वेतनश्रेणी खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | पदनाम | 6 व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी | 7 व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| | | वर्ग-02 | |
| 1. | सहाय्यक आयुक्त | 9300-34800 ग्रेड पे 4400 | S-15 41800-132300 |
| 2. | प्रभाग क्षेत्रिय अधिकारी | 9300-34800 ग्रेड पे 4400 | S-15 41800-132300 |
| 3. | चौकशी अधिकारी | 9300-34800 ग्रेड पे 4400 | S-15 41800-132300 |
| 4. | कामगार कल्याण अधिकारी | 9300-34800 ग्रेड पे 4400 | S-15 41800-132300 |
| 5. | आस्थापना अधीक्षक | 9300-34800 ग्रेड पे 4400 | S-15 41800-132300 |
| 6. | प्रशासन अधिकारी | 9300-34800 ग्रेड पे 4400 | S-15 41800-132300 |
| 7. | उप मुख्य लेखापरीक्षक | 9300-34800 ग्रेड पे 4400 | S-15 41800-132300 |
| 8. | सहाय्यक लेखापरीक्षक | 9300-34800 ग्रेड पे 4400 | S-15 41800-132300 |
| 9. | उप कर निर्धारक व संकलक | 9300-34800 ग्रेड पे 4400 | S-15 41800-132300 |
| 10. | अधीक्षक उप कर | 9300-34800 ग्रेड पे 4400 | S-15 41800-132300 |
| 11. | अधीक्षक मार्केट परवाना | 9300-34800 ग्रेड पे 4400 | S-15 41800-132300 |
| 12. | विशेष कार्यकारी अधिकारी | 9300-34800 ग्रेड पे 4400 | S-15 41800-132300 |
| 13. | उप नगर सचिव | 9300-34800 ग्रेड पे 4400 | S-15 41800-132300 |
| 14. | अंतर्गत लेखापरीक्षक | 9300-34800 ग्रेड पे 4400 | S-15 41800-132300 |
| 15. | हेड क्लार्क | 9300-34800 ग्रेड पे 4400 | S-15 41800-132300 |
| | | वर्ग-03 | |
| 16. | सहाय्यक सार्वजनिक आरोग्य अधिकारी | 9300-34800 ग्रेड पे 4300 | S-14 38600-122800 |
| 17. | वरिष्ठ आरोग्य निरीक्षक | 9300-34800 ग्रेड पे 4200 | S-13 35400-112400 |
| 18. | सहाय्यक तथा बिल्डींग इन्स्पेक्टर | 9300-34800 ग्रेड पे 4200 | S-13 35400-112400 |
| 19. | सब स्टेशन ऑफिसर | 9300-34800 ग्रेड पे 4200 | S-13 35400-112400 |

| अ.क्र. | पदनाम | 6 व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी | 7 व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| 20. | सिस्टिम ॲनालिस्ट | 9300-34800 ग्रेड पे 4200 | S-13 35400-112400 |
| 21. | मुख्य लिपीक | 9300-34800 ग्रेड पे 4200 | S-13 35400-112400 |
| 22. | सिस्टिम प्रोग्रामर | 5200-20200 ग्रेड पे 2800 | S-10 29200-92300 |
| 23. | लिडींग फायरमन | 5200-20200 ग्रेड पे 2400 | S-8 25500-81100 |
| 24. | यंत्रचालक | 5200-20200 ग्रेड पे 2000 | S-7 21700-69100 |
| 25. | फायरमन | 5200-20200 ग्रेड पे 1900 | S-6 19900-63200 |

3. शासन निर्णय क्र.मिभाम-1116/प्र.क्र.36(भाग-1)/16/नवि-28, दि.26/02/2019 नुसार मिरा भाईंदर महानगरपालिका आकृतीबंधास मान्यता दिल्यानुसार खालील संवर्गातील पदे दि.24/05/2019 रोजी पासून व्यपगत करण्यात आली आहेत. मा.आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचेकडील दि.17/05/2019 रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने खालील संवर्गातील व्यपगत करण्यात आलेली पदे सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत शासन निर्णय निर्गमित होईपर्यंत पुन:श्च मंजूर करणेकरीता दि.26/07/2019 रोजी नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन कडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. त्यामुळे खालील संवर्गातील पदावरील स्थायी अधिकारी/कर्मचारी यांना मंजुर पदाची सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी व सातव्या वेतन आयोगानुसार देय होणारी सुधारीत वेतनश्रेणी खालीलप्रमाणे:-

| अ.क्र. | पदनाम | 6 व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी | 7 व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| | | वर्ग-01 | |
| 1. | वैद्यकीय अधिकारी (शस्त्राक्रिया) | 15600-39100 ग्रे.पे. 6600 | S-23 67700-208700 |
| 2. | वैद्यकीय अधिकारी (अस्थिव्यंग शल्यचिककित्सक) | 15600-39100 ग्रे.पे. 6600 | S-23 67700-208700 |
| 3. | नेत्रशल्यचिकित्सक | 15600-39100 ग्रे.पे. 6600 | S-23 67700-208700 |
| 4. | मनोविकृती चिकित्सक | 15600-39100 ग्रे.पे. 6600 | S-23 67700-208700 |
| 5. | वैद्यकीय अधिकारी (चर्मरोग) | 15600-39100 ग्रे.पे. 6600 | S-23 67700-208700 |
| 6. | शरीरविकृती चिकित्सक | 15600-39100 ग्रे.पे. 6600 | S-23 67700-208700 |
| 7. | वैद्यकीय अधिकारी (स्त्री-रोग व प्रसुती तज्ञ) | 15600-39100 ग्रे.पे. 6600 | S-23 67700-208700 |
| 8. | दंतशल्यचिकित्सक | 15600-39100 ग्रे.पे. 5400 | S-20 56100-177500 |
| 9. | वैद्यकीय अधिकारी | 15600-39100 ग्रे.पे. 5400 | S-20 56100-177500 |
| | | वर्ग-03 | |
| 10. | क्ष-किरण तंत्रज्ञ | 9300-34800 ग्रे.पे.4200 | S-13 35400-112400 |
| 11. | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | 9300-34800 ग्रे.पे.4200 | S-13 35400-112400 |
| 12. | अधिपरिचारीका | 9300-34800 ग्रे.पे.4200 | S-13 35400-112400 |
| 13. | औषध निर्माता/मिश्रक | 5200-20200 ग्रे.पे.2800 | S-10 29200-92300 |

(८)

4. मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील स्थायी अधिकारी/कर्मचारी यांना सातवा वेतन आयोगानुसार देय असणारी थकबाकी अदा करण्यासाठी महानगरपालिकेची आर्थिक स्थिती विचारात घेऊन महाराष्ट्र शासन वित्त विभाग, दि.30/01/2019 रोजीच्या अधिसुचनेमधील अ.क्र.14 वेतनाची थकबाकी प्रदान करण्याची पध्दती नमुद केल्यानुसार व महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.वेपुर-2019/प्र.क्र.8/सेवा-9, दि.30/05/2019 मध्ये विहित केलेल्या पध्दतीनुसार सातवा वेतन आयोगानुसार देय असणारी थकबाकी अदा करण्याची कार्यवाही करण्यात येईल.
5. मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील मंजुर पदाची सातवा वेतन आयोगानुसार निश्चित करण्यात आलेली वेतनश्रेणी ही राज्य शासनाकडील संबंधित समकक्ष पदांना लागु करण्यात आलेल्या वेतनश्रेणीपेक्षा कोणत्याही परिस्थितीत अधिक नाही.
6. मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील पदाच्या वेतनश्रेणीबाबत समकक्षता ठरविताना काही अडचणी आल्यास शासनाच्या मान्यतेने निराकरण करण्यात येईल.
7. सातवा वेतन आयोगाचा लाभ हा केवळ महानगरपालिका आस्थापनेवरील मंजुर पदावर कार्यरत असलेल्या स्थायी अधिकारी/कर्मचारी तसेच सेवानिवृत्त वेतनधारक/कुटुंब निवृत्ती वेतनधारक यांना लागु करण्यात येईल.
8. सातवा वेतन आयोग संदर्भात शासन निश्चित करेल असा सुधारणा कार्यक्रम मिरा भाईंदर महानगरपालिकामार्फत राबविण्यात येईल.
9. मिरा भाईंदर महानगरपालिका अंतर्गतची विकास कामे, केंद्र व राज्य शासनाच्या योजनेतील महानगरपालिकेचा हिस्सा, विकास कामासाठी घेतलेले कर्ज आणि व्याज वेळोवेळी मुदतीत परत करण्यात येते व केलेली आहे. आणि भविष्यात मुदतीत परत करण्याची दक्षता घेण्यात येईल. महानगरपालिकेची आर्थिक स्थिती विचारात घेऊन कर्ज परतफेड क्षमता पडताळणी करुन एम.एम.आर.डी ने सिमेंट रस्ते योजनेपोटी नविन 100 कोटीचे कर्ज मंजूर केलेले आहे.
10. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ करुन आस्थापना खर्च पुढील 03 वर्षात विहित मर्यादेत राहील याकरीता मिरा भाईदर महानगरपालिकामार्फत महसूलात वाढ होण्यासाठी कर योग्य मालमत्तांचा सर्व्हे करण्याचा ठेका देण्यात आला आहे. यामधून ॲसेसमेंट मधुन ॲसेसमेंट न झालेल्या इमारती, भाडयाने दिलेल्या मालमत्ता, वाढीव बांधकामे यांचे नव्याने ॲसेसमेंट होऊन अंदाजित 50 कोटी रुपये कायमस्वरुपी उत्पन्न प्राप्त होणार आहे.
11. मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील स्थायी अधिकारी/कर्मचारी यांना सातवा वेतन आयोगानुसार सुधारित वेतनश्रेणी लागु केल्यामुळे येणारे अतिरिक्त वित्तीय दायित्व हे महानगरपालिकेच्या स्वउत्पन्नातुन भागविण्यात येईल.
12. मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील स्थायी अधिकारी/कर्मचारी यांना सातवा वेतन आयोग लागु करणेकरीता सन 2019-20 या अंर्थसंकल्पात देय वेतनाची व थकबाकीची तरतुद करण्यात आली आहे.

तरी मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील स्थायी अधिकारी/कर्मचारी तसेच सेवानिवृत्त वेतनधारक/कुटुंब निवृत्ती वेतनधारक यांना सातवा वेतन आयोग लागु करण्यास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेस शिफारस आहे.

गोषवारा प्राप्त दि २६/०८/२०१९ वेळ ११:३०
मा. स्थायी समिती / मा. महासभा गोषवारा नोंद
रजिस्टर अ. क्र ४० वर्ष :- २०१९-२०

(मा.आयुक्त यांचे मान्यतेने)

(डॉ. सुनिल लहाने)
अतिरिक्त आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

२६/०८/२०१९
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

(७)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०२/२०२० ,

## //टिपणी//

**प्रकरण क्र : ( ८५ ) महानगरपालिका अधिकारी/कर्मचारी यांना ७ वा वेतन आयोग लागू करणेसाठी महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीबाबत.**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेची सद्यस्थितीतील आर्थिक स्थिती व दरमहा अत्यावश्यक खर्च खालीलप्रमाणे आहे.

(आकडे कोटीत)

| | | |
|---|---|---|
| १ | पाणी बिल (स्टेम + MIDC) | 5.25 |
| २ | लाईट बिल (स्ट्रिट लाईट/कार्यालय/पंपिंग/इतर) | 2.95 |
| ३ | कर्मचारी वेतन स्थायी | 4.50 |
| | कर्मचारी वेतन अस्थायी | 1.84 |
| ४ | वॉर्ड सफाई (प्रभाग क्र.०१ ते ०६) | 8.85 |
| ५ | शिक्षण विभाग वेतन | 0.80 |
| ६ | वाहन इंधन भाडे | 0.25 |
| ७ | वृक्षप्राधिकरण मजूर वेतन | 0.81 |
| ८ | कर्ज परतफेड हप्ता | 3.16 |
| ९ | निवृत्ती वेतन | 0.58 |
| १० | दुरध्वनी देयक | 0.05 |
| | **एकूण** | **29.04** |

उपरोक्त अत्यावश्यक खर्च पाहता अद्यापपर्यंत पाणीबील/स्ट्रिट लाईट व इतर बील/वॉर्ड साफसफाई/वेतन/कर्जपरतफेड/शासकिय देणी आजतागायत वेळच्या वेळी प्रदान करण्यात आलेली आहेत. उपरोक्त बाबत महापालिका कुठल्याही प्रकारची थकबाकीदार नाही. अंदाजपत्रकात अशा अत्यावश्यक बाबींवर प्रथमतः दरवर्षी तरतूद करण्यात येत आहे. उर्वरित उत्पन्नातून इतर विकास कामे यासाठी तरतूद करण्यात येत असते. मोठ-मोठे प्रकल्प/योजना यासाठी वित्तीय संस्थांकडून वेळोवेळी कर्ज उभारणी करण्यात येत आहे. अशावेळी वित्तीय संस्था महापालिकेची कर्जपरतफेड क्षमता तपासूनच कर्ज मंजूर करत आहे.

### महानगरपालिकेची कर्ज स्थिती

| प्राप्त कर्ज | परतफेड | शिल्लक कर्ज |
|---|---|---|
| ३२६.२२ कोटी | ६८.४८ कोटी | २५७.७४ कोटी |

सद्यस्थितीत महापालिकेवर रक्कम रु.२५७.७४ करोड इतके कर्ज असून कर्जपरतफेडीचा वार्षिक हप्ता रु. ४१.३३ कोटी इतका आहे. यापैकी महापालिकेकडे एकही कर्जहप्ता थकीत नाही. कर्जपरतफेडीसाठी रक्कम रु.४५.२४ कोटी इतका राखीव निधी तयार करून ठेवण्यांत आलेला आहे.

१. भांडवली खर्चातून निर्माण होणाऱ्या मालमत्ता विचारात घेता यापासून दरवर्षी कायमस्वरुपी रक्कम भाडयापोटी उत्पन्न मिळत आहे. यामध्ये दरवर्षी १०% नैसर्गिक वाढ होत आहे.

(८)

२. पाणी दराबाबत महापालिकेने वाढ केलेली असून सद्या पाण्याचे दर खालीलप्रमाणे आहेत.

iii. घरगुती वापर :- रु.१३ प्रती १००० लिटर

iv. वाणिज्य वापर :- रु.५० प्रती १००० लिटर

सध्या स्टेम ऑथॉरीटी यांच्याकडून रक्कम रू.१०.९० प्रती १००० लिटर दर आकारला जातो. तसेच (MIDC) कडून रु.९.०० प्रती १००० लिटर दर आकारला जातो. पाणपट्टी वसूली दरवर्षी ९६ ते ९७% होत असल्याने यामध्ये तूट येत नाही. महापालिका वितरीत करीत असलेल्या पाण्यापासूनचे उत्पन्न रु.७५ कोटी इतके असून पाणी बिलापोटी वर्षाअखेरीस रक्कम रु.६३ कोटी प्रदान करावे लागत आहे.

३. शासनाकडून मिळणारे जीएसटी अनुदान दरमहा वेळीच प्राप्त होत आहे. यापासूनचे उत्पन्न रक्कम रु.२०५ कोटी इतके आहे.

४. विकास आकार यापासून जवळजवळ रु.७० कोटी दरवर्षी प्राप्त होत आहे.

५. मालमत्ता करापासून मिळणारे उत्पन्न हे रु.११५ कोटीं असून मालमत्ता सर्वेक्षण करणेबाबतची निवीदा देण्यात आलेली असून सर्व्हेक्षणाचे काम जोरात सुरु आहे. यापासून रक्कम रु.५० कोटी उत्पन्नात दरवर्षी कायमस्वरूपी वाढ होणे अपेक्षित आहे.

६. शहरामध्ये भुयारी गटार योजना राबविण्यात आलेली असून या योजनेच्या देखभाल/दुरुस्तीसाठी मलनि:सारण सुविधा लाभ कर लागू करण्यात आलेला असून यापासून रु.२२ कोटी इतके उत्पन्न प्राप्त होत आहे.

७. महापालिकेचे मुख्य उत्पन्न स्तोत्र

| | |
|---|---|
| १. मालमत्ता कर | रू.११५ कोटी |
| २. जीएसटी अनुदान | रु.२०५ कोटी |
| ३. विकास आकार | रु.७० कोटी |
| ४. इतर उत्पन्न | रु.६५ कोटी |
| एकूण उत्पन्न | रु.४५५ कोटी |

८. आस्थापना वेतनावरील खर्च

$$= \frac{\text{वेतनावरील वार्षिक खर्च रु.१४५.८० कोटी}}{\text{एकूण वार्षिक उत्पन्न रु.४५५.०० कोटी}} \times १०० = ३२.०४\%$$

महापालिकेचे वरील आर्थिक स्थितीचे विश्लेषण पाहता महापालिकेच्या अधिकारी/कर्मचारी यांना सातवा वेतन आयोग लागू करणेस मा.महासभेची मंजूरी मिळणेस विनंती आहे.

मुख्यलेखाधिकारी
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

गोषवारा प्राप्त दि. ११/02/२०२० २०१९-२०
मा. स्थायी समिती / मा. महासभा गोषवार नोंद
रजिस्टर अ. क्र ..... 66 ..... वर्ष :- २०१९-२०

११/02/2020 ०४:३० PM
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.20/02/2019

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. (८६) :- <u>वसई विरार व मिरा भाईंदर पुढे मुंबईस जोडण्यासाठी रेल्वेच्या पश्चिम बाजूस बृहन्मुंबई</u> महानगरपालिका हद्दीतील दहिसर लिंक रस्त्यास जोडणारा, 60.00 मी. रुंद रस्ता विकास योजनेत म.प्र. व न. अ. 1966 चे कलम 37 अन्वये दर्शविणेबाबत.**

- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्राची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) दि.14/05/1997 रोजी मंजूर झालेली असून दि.15/07/1997 पासून अंमलात आलेले आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना दि.25/08/2000 रोजी मंजूर झालेली असून दि.15/10/2000 पासून अंमलात आलेली आहे. मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय क्र. टिपीएस-1208/1346/ प्र.क्र.267/08/नवि-12, दि.29/08/2009 अन्वये फेरबदल मंजूर झाले आहेत.
- मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) मार्फत विस्तारित पायाभूत प्रकल्पा अंतर्गत वसई भाईंदर खाडी पुलाचे काम हाती घेण्यात येणार असून त्या पुलासाठी पुरक ठरणारा-दहिसर भाईंदर जोड रस्ता (रेल्वेच्या पश्चिम बाजूस वसई विरार महानगरपालिका क्षेत्रापासून वसई खाडीवर पुल बांधून मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातून पुढे बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील दहिसर लिंक रोडला जोडणारा 45.00 मी. रुंद रस्ता तयार करणेचे प्रस्तावित आहे. तदअनुषंगाने प्रस्तावित 45.00मी. विकास योजना रस्त्यालगत बृहन्मुंबई हद्दीतील रस्ता त्यांचे मंजूर विकास योजना दर्शविणेकरीता सर्व प्रथम पत्र क्र.मनपा/नर/2250/2013-14 दि.23/09/2013 रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.
- यानंतर सदर रस्त्यापैकी वसई खाडी ते सुभाषचंद्र बोस मैदान पर्यंतचा रस्ता विकास योजनेत दर्शविणेस मा. महासभा, दि.01/07/2015, ठराव क्र. 28 अन्वये मंजूरी देण्यात आलेली असून सदरचा महाराष्ट्र प्रांतिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37(1) चा फेरबदल प्रस्ताव शासनास पत्र क्र.मिभामनपा/नर/3648/2016-17 दि.16/11/2016 अन्वये सादर करणेत आला आहे. सदरचा फेरबदल प्रस्ताव शासनाने पत्र क्र.टिपीएस-1216/3171/प्रक्र.228/17/नवि-12 दि.31/01/2018 च्या पत्रान्वये कळविले आहे. तदअनुषंगाने आवश्यक त्या बाबींची पुर्तता करणेत आलेली आहे.
- मंजूर विकास योजनेत प्रस्तावित फेरबदला पुढील मिरारोड पश्चिमेकडे दर्शविलेला विकास योजना रस्ता काटकोनी वळणाचा असल्याने त्याऐवजी सुधारीत सरळ आखणी प्रस्तावित करण्याची सूचना सी.आर.झेड. प्राधिकरणाकडील स्टेट लेव्हल एक्सपर्ट अप्रेझल कमिटीने (SEAC-I) केली आहे. त्याप्रमाणे नव्याने सुधारीत आखणी दर्शविणेस महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये फेरबदल प्रस्ताव मा. महासभेपुढे सादर केला असता सदरच्या प्रस्तावास मा. महासभेने प्रकरण क्र.64, ठराव क्र.65 दि.05/9/2018 (तहकुब सभा दि.04/09/2018) अन्वये मान्यता दिलेली आहे. तथापि सदर महासभा मान्यतेने भाईंदर (पश्चिम) येथील समुद्र खाडी जवळील स.क्र.342(722)अे1 व 337(755) या जागेचा उल्लेख केलेला नाही.
- सबब सदर दुरुस्तीसह मंजूर विकास योजनेत सुभाषचंद्र बोस मैदान ते मौजे भाईंदर, स.क्र.151(625) पर्यंत दर्शविलेला 60 मी. रुंद विकास योजना रस्त्याची आखणी खालील प्रमाणे सुधारीत करणे आवश्यक आहे.

1) उपरोक्त नमुद विकास योजना रस्त्याची आखणी मौजे भाईंदर, स.क्र.226(650) पर्यंत (60 मी. रुंद रस्त्यानुसार) कायम ठेवणे.
2) त्यापुढील मौजे भाईंदर, स.क्र.226(650) पासून उपरोक्त विकास योजना रस्त्याची स.क्र.151(635) पर्यंतची आखणी वगळण्यात येते व सोबत जोडलेल्या नकाशात दर्शविल्याप्रमाणे स.क्र.22(192) पर्यंत (60 मी. रुंद रस्त्यानुसार) नव्याने आखणी प्रस्तावित करणे.

- प्रस्तावित फेरआखणीनुसार नव्याने दर्शविलेला 60 मी. रुंद रस्ता मौजे भाईंदर, स.क्र. स.क्र.342(722)अे व 337(755) पर्यंत तसेच स.क्र. (651)24, (650)226, (640)225, (641)224, (642)197, (635)199, (637)190, (749)189, (634)188, (750)187, (636), (751)187, (631)185, (622)181, (623)182, (625)151, (617)146, (763)147, (261)24, (192)22 या जागेतून जाणार आहे. प्रस्तावित रस्त्याखालील जागा CRZ बाधीत क्षेत्रामधील आहे.
- शासनाचे दि.31/01/2018 रोजीच्या पत्रातील मुद्दा क्र. "ड" नुसार वसई विरार, मिरा भाईंदर व बृहन्मुंबईस जोडणारा जोड रस्ता हा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत विकसीत करणेत येणार असल्याने मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील नविन प्रस्तावित विकास योजना रस्त्याची सुधारीत आखणी महानगरपालिकेचे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत प्राप्त करुन घेऊन सदर आखणी मु.म.प्र.वि. प्राधिकरणाकडे अंतिम मंजूरीसाठी दि.18/01/2019 रोजीच्या पत्रान्वये व तद्नंतर दि.03/09/2018 रोजीच्या पत्रान्वये पाठविण्यात आली आहे. तसेच याबाबत मा. शासनास पत्र क्र. मनपा/नर/3610/2018-19 दि.03/09/2018 अन्वये कळविण्यात आले आहे. सदर पत्राच्या अनुषंगाने एमएमआरडीए प्राधिकरणाने याबाबत मा. शासनास दि.18/02/2019 चा रस्ता आखणीबाबत बदल संबधित महानगरपालिकेच्या विकास योजनामध्ये करणेचे कळविले आहे. तथापि सदर प्रकरणाची कार्यवाही अद्याप शासनामार्फत झालेली दिसून येत नाही.
- प्रमुख अभियंता, विकास नियोजन बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी दि.14/12/2017 रोजीच्या पत्रान्वये विषयांकित प्रस्तावित रस्ता 13.40 मी. रुंदीमध्ये सुधारीत प्रारुप विकास आराखडा - 2034 मध्ये दर्शविणेकरीता मिरा भाईंदर महानगरपालिकेस कळविले असता सदर प्रस्ताव बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रस्तावित प्रारुप विकास आराखड्यात दर्शविणेकरीता मा. शासनास महानगरपालिकेने पत्र क्र.मनपा/नर/3610/2018-19 दि.03/09/2018 अन्वये पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. तथापि बृहन्मुंबई महानगरपालिका प्रसिद्ध विकास योजना - 2034 मध्ये सदर प्रस्तावित रस्ता दर्शविण्यात आलेला नाही.
- प्रस्तावित 60.मी. रुंद विकास योजना रस्ता हा आरक्षण क्र.91(स्टेडियम) याने भागश: बाधीत होत आहे. सदर प्रस्तावित विकास योजना रस्त्यामुळे मिरा भाईंदर महानगरपालिका मंजूर विकास योजनेमधील आरक्षण् क्र.91(स्टेडियम) चे मिळणारे क्षेत्राबबात सर्व्हेअर मे एम.बी. राणे यांचेकडील मोजणी नकाशानुसारची वस्तूस्थिती खालीलप्रमाणे आहे.
- मंजूर विकास योजनेनुसार आरक्षण क्र. - 91(स्टेडियम)
- मंजूर विकास योजना अहवालानुसार आरक्षणाचे समूचिक प्राधिकरण - मिरा भाईंदर महानगरपालिका
- मंजूर विकास योजना अहवालानुसार आरक्षणाचे क्षेत्र - 1,80,000 चौ.मी.
- प्रत्यक्ष जागेवर आरक्षण क्र. 91 (स्टेडियम) चे मिळणारे एकूण क्षेत्र - 2,09,258 चौ.मी.
- 60.0 मी. रुंद आखणीनुसार आरक्षण क्र. 91 चे प्रस्तावित विकास योजना रस्त्याखाली जाणारे क्षेत्र 7743 चौ.मी.
- आरक्षण क्र.91(स्टेडियम) चे उर्वरीत क्षेत्र - 2,01,512 चौ.मी.
- दरम्यान उपरोक्त प्रकरणी मा. महासभेकडील ठरावाच्या अनुषंगाने मा. राजपत्रात दि.13 डिसेंबर ते 19 डिसेंबर 2018 व वृत्तपत्रात दि.13/12/2018 रोजी अधिसुचना प्रसिध्द करण्यात आलेली आहे.
- प्रसिद्ध अधिसूचनेच्या अनुषंगाने खालील प्रमाणे सुचना / हरकती मिरा भाईंदर महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या आहेत.
- 1) श्री. धीरज रमेश परब, 2) श्री. प्रदिप जंगम, 3) श्री. कृष्णा सी गुप्ता
- वरील प्राप्त हरकती / सुचना धारकांसह सॉल्ट विभागाचे अधिकारी यांस दि.29/11/2019 रोजी सकाळी 11.30. वाजता आयुक्त यांचे दालनात सुनावणीस बोलवण्यात आले होते.
- आयोजित सुनावणीत एकूण हरकत धारक / सुचना धारक यांचेपैकी श्री. धिरज परब व सॉल्ट विभागाचे अधिकारी उपस्थित होते.
- मा. महासभा प्रकरण क्र.64 ठराव क्र.65 दि.05/09/2018(तहकूब सभा दि.04/09/2018) नुसार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) यांचेकडील अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर प्रस्तावित रस्त्याच्या रुपेरेषेत बदल असल्यास त्याप्रमाणेची रुपरेषा निश्चित करुन फेर प्रस्ताव मा. महासभेकडे सादर करणेबाबत कळविलेले आहे.
- तथापि संबंधित प्राधिकरणाच्या प्रस्तावित फेरबदलाबाबतची रुपरेषा अद्याप मिरा भाईंदर महानगरपालिकेस प्राप्त झालेली नाही.
- वरील वस्तुस्थिती पाहाता उपरोक्त महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37(1) अन्वयेचा फेरबदल प्रस्ताव सद्यस्थितीत अंतिम मंजुरीकरीता मा. शासनास सादर करणेच्या अनुषंगाने अंतिम मंजुरी मिळणेकरीता अहवाल मा.महासभेस सादर.

गोषवारा प्राप्त दि. 20/12/2019 वेळ 4.50
मा. स्थायी समिती / मा. महासभा गोषवारा नोंद
रजिस्टर अ. क्र. 44 वर्ष 2019-20
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

(बालाजी खतगांवकर)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका
17/12/19

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. 20 / 02 /2020

## गोषवारा

विषय :८७ ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालयातून लाचलुचपत प्रकरणी अटक करण्यात आलेले महानगरपालिकेतील अधिकारी/ कर्मचारी यांचेवर मा. न्यायालयात अभियोग दाखल करणेकरीता मा. आयुक्त यांनी दिलेल्या मंजूरी प्रकरणाचे अवलोकन करणे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 अंतर्गत गुन्हे दाखल केल्यानंतर ॲन्टी करप्शन ब्युरोच्या अधिकाऱ्यांनी त्यांना रंगेहात पकडल्यानंतर संबंधित कर्मचाऱ्यांना सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक: अभियो-1312/प्र.क्र.30/पुर्नबांधित-1/11अ, दि.12 फेब्रुवारी, 2013 मधील परिच्छेद 9(क) नुसार लाचेचा सापळा प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर अपचारी अधिकारी/कर्मचारी यांना तात्काळ निलंबीत करण्याची कार्यवाही सक्षम प्राधिकाऱ्यांनी करावी असे आदेश आहेत. या आदेशानुसार महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, 1979 मधील नियम 4 नुसार व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 56(2) मधील तरतुदीनुसार संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना सेवेतून निलंबीत केलेले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 59-अ नुसार महानगरपालिकेचे अधिकारी/कर्मचारी यांचेवर खटला भरण्यास मंजूरी देणे मध्ये खालील प्रमाणे नमुद आहे:-

"कलम 53 किंवा या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, महानगरपालिकेच्या कोणत्याही अधिकाऱ्यांवर किंवा कर्मचाऱ्यांवर खटला भरण्याची मागणी पोलीसांकडून किंवा अन्य कोणत्याही शासकीय अभिकरणाकडून करण्यात आली असेल तर त्यास मंजुरी देण्यास आयुक्त सक्षम असेल. आयुक्त, अशा कोणत्याही कार्यवाहीच्या मंजुरीची माहिती नगरपालिकेच्या पुढील सभेमध्ये महानगरपालिकेला कळवील."

श्री. शैलेश शामराव शिंदे, कनिष्ठ अभियंता, प्रभाग कार्यालय क्र.06 यांचेबाबत जा.क्र.मनपा/आस्था/1968/2018-19, दि.11/03/2019 रोजीच्या आदेशान्वये तसेच श्री. प्रशांत घनश्याम कोळी, लिपीक, नगररचना विभाग यांचेबाबत जा.क्र.मनपा/आस्था/1072/2019-20, दि.19/11/2019 रोजीच्या आदेशान्वये मा. न्यायालयात अभियोग दाखल करणेसाठी महानगरपालिका अधिनियमातील कलम 59-अ अन्वये मंजूरी दिली आहे.

तरी वर नमुद केलेल्या कार्यवाहीची माहिती महानगरपालिका अधिनियमातील कलम 59-अ नुसार मा. महासभेपुढे अवलोकनार्थ सादर करणेत येत आहे.

(बालाजी खतगांवकर)
06/01/20
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उदयान व वृक्ष प्राधिकरण विभाग

मा. महासभा दि. 20 / 02 /2020

// गोषवारा //

**प्रकरण क्र. ८८ :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्यानामध्ये CSR फंडा अंतर्गत सौर LED High mast व सौर दिवे बसविणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात 74 उद्याने, 11 मैदाने, 14 स्मशाने व 17 दुभाजके विकसीत करण्यात आलेली आहे. सदर ठिकाणची उद्यानात शोभिवंत झाडे, खेळणी व व्यायामाचे साहित्य बसविण्यात आलेले आहे. सदरची उद्याने संध्याकाळी वेळेत चालु असतात. याकरीता उद्यानामध्ये काही अनुचीत प्रकार घडू नये या करीता लाईटची व्यवस्था करण्यात आली आहे.

त्याकरीता उद्यानामध्ये उजेडासाठी वीजेवरचे दिवे व High mast बसविण्यात आलेले आहेत. त्याकरीता मिरा भाईंदर महानगरपालिकेला करोडो रुपयाचे वीज देयक वीज कंपनीला अदा करावे लागते. तसेच सदर दिवाबत्तीच्या देखभालीवरतीही खर्च केला जातो.

तथापी जर उद्यानामध्ये सौर दिवे बसवले तर नैसर्गीक संसाधनाचा पुरेपूर वापर होईल व महानगरपालिकेची वीजबीलावर होणाऱ्या खर्चाची बचत होईल.

त्याकरीता S.B. Powertronics या नाशिकच्या कंपनीने मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्यानामध्ये CSR फंडा अंतर्गत सौर LED High mast व सौर दिवे बसविण्याचा प्रस्ताव DPR प्राप्त झालेला आहे. त्याकरीता सौर LED High mast व सोलर दिवे बसविणे व 2 वर्ष निगा देखभाली करीता रु. 10,91,25,098/- चा खर्च DPR मध्ये नमूद केलेला आहे. परंतू सदरचा सर्व खर्च हा इंडियन ऑईल कॉर्पोरेशन यांच्या कडून करण्यात येणार आहे. तसेच प्रत्यक्ष काम S.B. Powertronics या कंपनी मार्फत करण्यात येणार आहे.

तसेच मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या उद्यानामध्ये अशा प्रकारचे सौर दिवे बसविले तर वीज बिलाची बचत होईल व सदरचे दिवे हे सेन्सर स्वयंचलित असल्याने दिवस मावळल्या नंतर चालू होतील व सकाळी आपोआप बंद होतील. याकरीता लागणाऱ्या मनुष्यबळाचा खर्च कमी होईल.

तरी मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या उद्यानामध्ये CSR फंडा अंतर्गत Indian Oil Corporation मार्फत S.B. Powertronics या कंपनीस सौर LED High mast व सौर दिवे बसविण्यास मा. महासभेची मंजूरी मिळण्यास शिफारस आहे.

14/01/2020

(बालाजी खतगांवकर)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## बांधकाम विभाग

## मा. विशेष महासभा दि.20/02/2020

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक ( ८९ ) :-** विविध विकास कामांच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.
(बांधकाम विभाग)

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात करावयाच्या खालील कामांची अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली आहेत.

| | | |
|---|---|---|
| 1) | भाईंदर (पुर्व) नवघर लोकमान्य टिळक सभागृह पहील्या मजल्याचे बांधकाम करणे. (खासदार निधी, आमदार निधी, महापौर स्वेच्छा निधी) | रू.1,05,94,650/- |
| 2) | भाईंदर (पुर्व) संत तुकाराम महाराज मार्गावर टॉवर सभोवताली जागेचे, दुभाजकाचे सुशोभिकरण करणे. (मा. महापौर स्वेच्छा निधी) | रू.29,20,950/- |
| 3) | भाईंदर (पुर्व) नवघर शाळा क्र.13 शाळा बांधणे ठिकाणी वाढीव खर्चास मान्यता देणे. | रू.88,30,000/- |
| 4) | भाईंदर (पुर्व) जैसल पार्क जुन्या जल कुंभाच्या जागेवर समाज मंदिर व अभ्यासिका बांधणे. (महापौर स्वेच्छा निधी व मनपा निधी) | रू.98,01,240/- |
| 5) | उत्तन घनकचरा प्रक्रिया प्रकल्प ठिकाणी इर्नट मटेरीयल सपाटीकरण करीता पोकलन, जेसीबी चेन डोझर, डम्पर, टोरस, मजुर इ. भाड्याने घेणे, लिचड प्रक्रिया करणे. | रू.1,50,00,000/- |

वरील कामाच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणेस शिफारस आहे.

(शहर अभियंता)
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**मा. आयुक्त यांच्या मान्यतेने**

PC-M /2019-20/D.K/M-Go -9